वर्ष- ११ अंक- ४२ मुंबई, मंगळवार, ०२ सप्टेंबर ते ०८ सप्टेंबर २०२५ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

PG|2

सुंदर त्वचेसाठी मुलतानी माती


संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

3 → सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार

लालबागचा राजा मंडळाला अन्नछत्रासाठी परवानगी नाकारली ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

गोल्डन नेस्टचा राजा मंडळात मानाचा सत्कार







भाईंदर

नवसाला पावणारे लालबागच्या राजाची प्रतिकृती म्हणून प्रसिद्ध असलेले गोल्डन नेस्ट चा राजा यंदा आपल्या २४ व्या वर्षात प्रवेशला आहे. या निमित्ताने मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भक्तिमय वातावरणात भव्य उत्सवाचे आयोजन केले.

यावेळी विशेष समारंभात 'दैनिक मराठी एकीकरण' बातमीपत्राचे संपादक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक व संपादिका सौ. प्रीती नाईक यांचा मंडळात मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, 'गोल्डन नेस्ट चा राजा हा भक्तांच्या नवसाला पावणारा गणपती म्हणून ओळखला जातो. गेल्या २४ वर्षांत गणेशभक्तांच्या मनामनात श्रद्धा व एकीचे बंध दृढ करण्याचे काम आमच्या मंडळाने केले आहे.'

कार्यक्रमास मोठ्या संख्येने गणेशभक्त उपस्थित होते. सत्कारावेळी उपस्थित सर्वांनी नाईक दाम्पत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

ओसवाल बिल्डरने बनावट परवानगी दस्त ऐवज वापरून लोकांची केली फसवणूक












मिरारोड - बनावट बांधकाम परवानगीव्दारे सदनिकेची विक्री करुन सदनिकाधारकांची फसवणुक करणारा बिल्डर ओस्तवाल बिल्डर्स प्रा.ली. चे संचालक उमरावसिंह ओस्तवाल आर्थीक गुन्हे शाखेकडुन गजाआड. अधिकमाहतीनुसार आरोपी विकासक श्री. ओस्तवाल बिल्डर्स ली. यांनी बनावट सुधारीत बांधकाम परवानगी व नकाशा तयार करून ते खरे असल्याचे भासवुन त्याआधारे मंजुरीपेक्षा जास्त माळ्याचे वाढीव बेकायदेशीर बांधकाम केले व नमुद बांधकाम केलेल्या सदनिकेची विक्री करुन मेसर्स ओस्तवाल पॅराडाईज बिल्डींग क्र. ६ सी.एच.एस.ली. मधील सदनिकाधारकांची करोडो रुपयाची फसवणूक केल्यामुळे सदनिकाधारकांच्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नयानगर दिनांक १६/०५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचा तपास मा. पोलीस आयुक्त श्री. निकेत कौशिक, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. संदिप डोईफोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. मिलींद पाटील यांच्या मार्गदर्शनात सपोनि नितीन चौधरी आर्थीक गुन्हे शाखा हे करीत आहे. नमुद गुन्हयाचे तपासामध्ये गुन्हयातील आरोपी बांधकाम व्यावसायीक श्री. ओस्तवाल बिल्डरचे संचालक आरोपी उमरावसिंह पृथ्वीराज ओस्तवाल यांचा गुन्हयातील सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्याकरीता तपासी अधिकारी स्टॉफसह त्याचे निवासस्थानी गेले असता आरोपीस चाहुल लागल्याने ते पळून गेले. त्यानंतर गुन्हे प्रकटीरण कक्ष १ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. सुशिलकुमार शिंदे यांनी तांत्रीक बाबीचा अभ्यास करुन आरोपी पळून जात असतांना शिताफीने त्यास स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेवुन आर्थीक गुन्हे शाखेच्या ताब्यात पुढील कारवाईस्तव देण्यात आले. तपासी अधिकारी यांनी आरोपीस रितसर अटक करुन मा. न्यायालयाचे समक्ष रिमांडकामी हजर केले आहे. नमुद आरोपीच्या पूर्व इतिहासाची माहीती घेतली असता आरोपीचे विरोधात १) नवघर, २) मिरारोड, ३) नयानगर, ४) काशीमिरा पोलीस ठाण्यात एकुण १३ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

टीओडी मीटरमध्ये छेडछाड,दोन घटना उघडकीस



कल्याण । महावितरण कडून राज्यात जुने मीटर काढून नवीन टीओडी मीटर(टाईम ऑफ डे) लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मीटर मध्ये छेडछाड करण्याच्या दोन घटना कल्याण परिमंडळातील बदलापूर आणि वसई येथे उघडकीस आल्या आहे. कल्याण परिमंडळात देखील मोठ्या प्रमाणात वीज ग्राहकांचे जुने मीटर बदलून नवीन टीओडी मीटर लावले आहेत. वीज देयक कमी यावे यासाठी काही ग्राहक मीटरमध्ये छेडछाड करीत असतात. पण प्रत्यक्षात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत वीज वापर करणाया ग्राहकांना ८० पैसे प्रति युनिट सुट मिळते आहे. महावितरण कडून लावण्यात येणाऱ्या टीओडी मीटरमध्ये छेडछाड करणे अवघड झाले आहे. नवीन टीओडी मीटरमध्ये कम्युनिकेशन पोर्ट लावले असल्याने ग्राहकाच्या क्षणाक्षणाच्या वीज वापराची माहिती महावितरण यंत्रणेला मिळत असते. जर ग्राहकाने यात छेडछाड केली तर त्या ठिकाणी जाऊन मीटरची तपासणी करून खात्री करण्यात येते.या टीओडी मीटरमध्ये छेडछाड केली तर वीज बिल कमी होण्या ऐवजी ते वाढले आहे.महावितरणच्या बदलापूर आणि वसई उपविभागातील गुणवत्ता नियंत्रण विभागाने अशा संशयित ग्राहकांच्या वीज वापरावर लक्ष ठेवले होते. प्रत्यक्ष ग्राहकाचे मीटर लावले त्या ठिकाणी जाऊन तपासणी केली असता यात छेडछाड केल्याचे आढळून आले. अशा ग्राहकांच्या विरोधात पोलीस तक्रार करण्याची कारवाई महावितरण कडून देण्यात सुरू झाली आहे.वीज मीटर मध्ये छेडछाड करणे हा दंडनीय अपराध आहे. वीज चोरी करणाऱ्यास कठोर कारावास किंवा आर्थिक दंडाची तरतूद वीज कायद्यात करण्यात आली आहे. जर महावितरणच्या टीओडी मीटरमध्ये छेडछाड करीत असल्याचे आढळून आल्यास जवळच्या महावितरण कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे.

लालबागच्या राजाला डॉलरचा हार दान



मुंबई । मुंबईतील प्रसिद्ध गणपती लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी प्रचंड गर्दी केली. देश-विदेशातून आलेल्या भक्तांनी नवसापोटी मोठ्या प्रमाणावर दान अर्पण केले. पहिल्याच दिवशी लाखो रुपयांची रोकड जमा झाली असून दानपेटीत सोने-चांदी व परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळाले आहे. विशेष म्हणजे भाविकांकडून आलेला अमेरिकन डॉलर्सचा हार सध्या चचेर्चा विषय ठरला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्मचारी दानपेट्यांतील नोटांची मोजणी करत असून त्यात १०, ५०, १०० आणि ५०० रुपयांच्या नोटांसह परदेशी नोटाही आढळल्या. लालबागच्या राजाला भाविकांकडून मिळालेल्या दानामध्ये दोन लाख रुपये किमतीचा सोन्याचा मोदक, सोन्याची पावपले, हार, मुकुट, अंगठ्या, नाणी, सोन्याचे गणपती तसेच एक किलो वजनाची चांदीची वीट, चांदीचे मोदक, गणपती, मुकुटं, हार, पाळणे, समया आणि फुलघरे यांचा समावेश आहे. याशिवाय कोट्यवधी रुपयांची रोकड आणि अगदी क्रिकेट बॅटसुद्धा दानपेटीत मिळाली आहे.



मराठवाड्यात पूरस्थितीमुळे जनजीवनविस्कळीत!

बीड । मराठवाड्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पावसाने पुन्हा कहर केला. यामध्ये नांदेड , लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला. अनेक रस्ते पाण्याखाली गेले. शेतांमध्ये पाणी शिरल्याने शेतीचेही प्रचंड नुकसान झाले. प्रशासन दक्ष असून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सुरू आहे. नांदेड जिल्ह्यात काल सायंकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे मुखेड, कंधार व नायगाव तालुक्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. मुखेड तालुक्यातील चांडोळा, येवती, जांब, बाऱ्हाळी, मुक्रमाबाद, अंबुलगा आणि जाहुर यांसह आठ गावांना पावसाचा जबरदस्त फटका बसला. हसनाळ व रावणगाव ही बुडीत क्षेत्रातील गावे पुन्हा पाण्याखाली गेली. कंधार तालुक्यातील हाळदा, भूकमारी, चौकी महाकाय, लाडका, गोणार, देवईचीवाडी, गुंडा, जाकापूर, चिखली अशा २० गावांमध्ये पुराचे पाणी शिरले. लाडका, मानसिंगवाडी, रुई व मोहिदा परांडा या गावांचा संपर्क तुटला. उर्ध्व मन्यार प्रकल्प धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे त्यातील अतिरिक्त पाणी सोडले. सध्या ७ दरवाजे उघडले आहेत. कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी नागरिकांना दक्षतेचा इशारा दिला आहे. नायगाव तालुक्यातील नरसी येथे ११५ मिमी पावसाची नोंद झाली. नरसी झ बिलोली मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आणि अनेक घरांमध्ये पाणी शिरले. बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर येथे काल रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे वाण नदीला पूर आला. त्यामध्ये धारूर-आसरडोह आणि धारूर-आडस मार्गावरील पूल पाण्याखाली गेले. या पाण्यात चारचाकी व रिक्षा वाहून गेल्याने नितीन कांबळे (४२) यांचा मृत्यू झाला. तर अनिल लोखंडे (२६) हा युवक अद्याप बेपत्ता आहे. लातूर जिल्ह्याच्या सीमेवरील धडकनाळ व बोरगाव परिसरात पुन्हा पूरस्थिती निर्माण झाली.

कच्च्या केळ्याचे वडे

साहित्य - चार कच्ची केळी, अर्धा चमचा मोहरी, चिमूटभर हिंग, आठ ते दहा कढीपत्ता पानं, पाव चमचा हळद, चार ते पाच हिरव्या मिरच्या, एक इंच आलं, मीठ, कोथिंबीर, एक कप बेसन, पाव चमचा हळद, अर्धा चमचा लाल मिरची पावडर, एक चिमूट खायचा सोडा, तेल.

कृती - प्रथम चार कच्ची केळी कुकरमध्ये तीन ते चार शिट्या काढून उकडून घ्या आणि नंतर त्याचं साल काढून, कुस्करून घ्या. एका कढईत तेल घालून मोहरी, हिंग, कढीपत्त्याची फोडणी करा. नंतर त्यात हळद, आले, मिरची खर्डा आणि कुस्करलेलं केळं घाला. आता त्यात मीठ घालून ते वाफवून घ्या. कोथिंबीर घाला आणि तयार भाजी थंड होऊ द्या. दुसऱ्या एका भांड्यात बेसन, मीठ, हळद, तिखट आणि सोडा घाला. थोडं पाणी घालून भज्यासारखं पीठ तयार करा. तयार भाजीची गोळे करा आणि पिठात घोळवून तेलात फ्राय करून घ्या. वडे झाले की हिरवी चटणी आणि टोमॅटो सॉस बरोबर सर्व्ह करा.



सुंदर त्वचेसाठी मुलतानी माती

मुलतानी मिट्टी किंवा मुलतानी माती भारतात शेकडो वर्षांपासून त्वचेच्या सौंदर्यासाठी आणि निरोगीपणासाठी वापरली जात आहे. जेव्हा कॉस्मेटिक्स बाजारात नव्हतीच, तेव्हापासून भारतीय महिला आपल्या त्वचेसाठी ही माती वापरत आल्या आहेत. बाजारातील महागडी आणि काहीवेळा त्वचेला अपाय होऊ शकणारी क्रीम्स किंवा पॅक वापरण्यापेक्षा ही माती निर्धकपणे त्वचेसाठी वापरता येते आणि महागड्या कॉस्मेटिक्सच्या तुलनेत ती स्वस्त असतेच; पण त्यापासून कोणताही अपाय होण्याचा धोका नसतो.



चेहऱ्यावरील सुरकुत्या, पुरळ, मुरमे, काळे डाग, ब्लॅक हेड, व्हाईट हेड, व्रण यांसारख्या अनेक कारणांसाठी ही माती अत्यंत सुरक्षित आणि उपयुक्त आहे. त्यामुळे ती वापरून त्वचेवर काय चमत्कार घडतो हे अनुभवण्यास काहीच हरकत नाही.

या मातीचे काही फायदे प्रथम समजून घेऊ. या मातीत मॅग्नेशियम क्लोराईड असते, ज्यामुळे पुटकुळ्या आणि त्वचेवरील डाग कमी होतात. त्वचा तेलकट असेल तर ही माती त्वचेतील अनावश्यक जादा तेल शोषून घेते आणि नवीन पिंपल्स येण्यास अटकाव करते. या मातीपासून बनविलेले फेसपॅक त्वचा स्वच्छ बनवितात तसेच धूळ, तेल व त्वचेवरील मृत पेशी हटवतात. त्वचेला लाली येत असेल, तर ती कमी करण्यासाठी आणि व्रण कमी करण्यासाठी तसेच त्वचेला शांत आणि सूदिंग इफेक्ट देण्यासाठीही ही माती अतिशय उपयुक्त ठरते. तसेच त्वचेवर पिगमेंटेशन होत नाही आणि त्वचा टॅन होण्यापासूनही सुटका होते.

या मातीपासून घरच्या घरीच फेसपॅक बनवून ते वापरता येतात. त्वचा तेलकट असेल तर मुलतानी माती, गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद घालून त्याची पातळ पेस्ट करावी आणि चेहरा व मानेवर लावावी. डोळ्याभोवती लावू नये. हा पॅक वाळू द्यावा व नंतर पाण्याचे तोंड स्वच्छ धुवावे. पॅक लावल्यानंतर जास्त बोलू नये अथवा चेहऱ्याची जास्त हालचालही करू नये.



पिंपलचे डाग त्वचेवर असतील तर मातीत ताज्या टोमॅटोचा रस, चिमूटभर चंदन पावडर आणि चिमूटभर हळद घालून पेस्ट बनवावी आणि ती चेहऱ्यावर लावावी. डोळ्याखालची काळी वर्तुळे जाण्यासाठी माती, दही आणि पुदीन्याच्या पानाच्या पेस्टसह कालवावी आणि लावावी. हा पॅक अर्धा तास चेहऱ्यावर ठेवून नंतर कोमट पाण्याने तोंड धुवावे.

विशेष म्हणजे त्वचेला कोणताही विकार नसेल आणि त्वचा चांगलीच असेल तरी ती अधिक चांगली, मऊ तसेच चमकदार होण्यासाठी या मातीचा लेप थोड्याशा तेलासह चेहऱ्यावर लावावा.

ही माती ओळखायची कशी, असा एक प्रश्न येतो. मात्र, ती वास आणि रंगावरून सहज ओळखता येते. मातीचा रंग फिकट पिवळसर असतो, तर वास ताज्या चिखलासारखा असतो. या मातीपासून बनविलेले पॅक बाजारात मिळतात, मात्र शक्यतो मातीच विकत आणून वरीलप्रमाणे आवश्यकतेनुसार मिश्रण करून केलेले पॅक स्वस्त पडतात. तसेच त्यापासून अपाय होण्याची भीतीही राहत नाही.

नॉर्मल त्वचा असेल तर मातीत दूध आणि बदामाची थोडी पूड घालून पॅक करावा आणि चेहऱ्यावर लावावा. पुटकुळ्या येत असतील, तर त्या जाण्यासाठी या मातीत कडूनिंब आणि कापूर घालून गुलाबपाणी घालावे व ते मिश्रण त्वचेवर लावावे. हे मिश्रण आठवड्यातून एकदाच लावावे.

आपल्यासाठी योग्य डायट प्लान

दिवसभरात कामाच्या भानगडीत महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनेक लोक योग, व्यायाम किंवा वॉक करत असल्यातरी एवढं पुरेसे नाही. आपल्याला योग्य आहाराची गरज देखील आहे. आहार योग्य नसल्यास शरीरात पोषक तत्त्वांची कमी राहते, ज्यामुळे आजाराला आमंत्रण मिळतं. अशात वर्किंग वूमन असो वा हाऊस वाइफ परफेक्ट डायट आपल्याला एनर्जी प्रदान करेल.

ब्रेकफास्ट: सकाळी आठच्या सुमारास नाश्ता करावा. ब्रेकफास्टमध्ये सांजा, ऑम्लेट, कॉर्न फ्लेक्स, ओट्स, म्यूसली यातून आपल्या आवडीप्रमाणे पदार्थ निवडणे योग्य ठरेल.

मिड-मॉर्निंग: अकरा वाजताच्या सुमारास अंडं, फ्रेंच टोस्ट, अंडं-टोस्ट, व्हेज सूप, लहान सँडविच, धिरडं, मिनी व्हेज पराठा किंवा 1 वाटी फ्रूट चाट घेणे योग्य ठरेल.

लंच: दुपारी दीडच्या सुमारास वरण-भात, भाजी-पोळी, कोशिंबीर दही किंवा ताक घ्यावे.

नून स्नॅक्स: मिल्क शेक, मूठभर रोस्टेट चणे किंवा दाणे, मुरमुरे, स्प्राऊटेड धान्य घेता येईल.

डिनर: आठ वाजता रात्रीचे जेवण करत त्यात चिकन, मटण, पनीर, डाळ, भाज्या, सॅलड, दही किंवा ताक सामील करता येईल. पूर्ण डायटमध्ये सकाळी आणि रात्रीच्या जेवणात फुलके दोन आणि तेही मल्टीग्रेनने तयार केलेल्या असल्यास उत्तम. आपण भाज्या, डाळ आणि सॅलड भरपूर प्रमाणात खाऊ शकतात.



हे देखील लक्षता ठेवा

- आहारात पोषक तत्त्व जसे व्हिटॅमिन्स, झिंक, प्रोटीन, कॅल्शियम इतर सामील करावं. स्वतःला हायड्रेड ठेवण्यासाठी दिवसात १० ग्लास पाणी पिण्याची सवय असावी. आहारात लिंबू पाणी, नारळ पाणी, ग्रीन टी, ज्यूस सामील करावे.
- मधे चहा-कॉफी घेण्याची सवय असल्यास त्याचे प्रमाण कमी असावे, तसेच त्यात साखरेचे प्रमाणदेखील कमी असावे.
- तसेच ब्रेकफास्ट सोडून कधीच एनर्जी फिल करू शकणार नाही म्हणून कितीही व्यस्त असला तरी नाश्ता करणे गरजेचे आहे.



कमी रक्तदाबाला 'हायपोटेन्शन' सुद्धा संबोधले जाते. जेव्हा रक्तदाबाचे मापन करणाऱ्या मशीनमध्ये ९०/६० एमएमएचजी किंवा त्यापेक्षाही कमी रक्ताचे निदान होते, त्यास 'हायपोटेन्शन' मानले जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीच्या रक्तदाबाचे प्रमाण फार कमी झालेले असते. तेव्हा चक्कर येणे, थकवा जाणवणे, मळमळणे, श्वास घेण्यास अडथळे निर्माण होणे, त्वचा तेलकट होणे यांसारखी लक्षणे समोर येतात.

कमी रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी एक घरगुती साधा उपाय

आल्याचे सेवन 'हायपोटेन्शन'साठी लाभदायक

- आल्याचे सेवन आरोग्यासाठी लाभदायक ठरते. आल्यामध्ये ॲण्टी इंफ्लेमेट्री, ॲण्टी बॅक्टेरियल, ॲण्टी ऑक्सिडेंटशिवाय आणखीही काही पोषक तत्त्व असतात.
- आल्यामधील या पोषक तत्त्वांमुळे सूज कमी करण्यास तसेच सर्दी-खोकला कमी करण्यास फायदेशीर ठरते.
- सकाळी उठल्यावर रिकाम्यापोटी आल्याचे पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- आल्याचे पाणी प्यायल्याने रोगप्रतिकार शक्तीही चांगली होती. पित्त झाल्यासही आल्याचे पाणी प्यायल्याने आराम मिळतो.

मिठाचे पाणी 'हायपोटेन्शन'साठी लाभदायक

- मिठाचे पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. पण मिठाचे प्रमाण नेमके किती असावे, यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- मिठामध्ये सोडियमचे गुण असल्यामुळे रक्तदाब वाढण्यास मदत होते.
- एक ग्लास पाण्यात अर्धा चमचा मीठ एकत्र करून प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. पण मीठ शरीराला तेवढाच घातक पदार्थ आहे. म्हणून एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या.

उन्हातून आल्यावर काही लहान मुलांमध्ये नाकातून रक्तस्राव होतो. याला घोळणा फुटणे असे म्हणतात. यात नाकाच्या पुढच्या भागातल्या नाजूक रक्तवाहिन्या (केशवाहिन्यांचे जाळे) उष्णतेने फुगून फुटतात व रक्त येते. काही वेळा अतिरिक्त दाब किंवा रक्ताच्या कर्करोगात पण घोळणा फुटतो. म्हणून वारंवार असा त्रास होत असल्यास तज्ज्ञास दाखवावे.



लहान मुलांच्या नाकातून रक्तस्राव होत असेल तर 'हे' करा

प्रथमोपचार

रक्तस्राव सुरू असताना जास्त हालचाल न करता बसून राहावे. डोके पुढे झुकलेले ठेवावे. म्हणजे रक्त गिळले जाणार नाही. ॲड्रेनॅलिन स्प्रे उपलब्ध असल्यास नाकात एकदा फवारा मारावा. याने रक्तवाहिन्या आकसून रक्तस्राव थांबतो. वाटल्यास ५ मिनिटांनी परत एकदा मारावा. मात्र अतिरिक्त दाबाच्या रुग्णांना हा उपचार करू नये.

नाकाचा पुढचा भाग हाताच्या बोटाने २-५ मिनिटे दाबून धरावा. याने रक्तवाहिन्यांतून रक्त येणे बंद होते. नाकाला व गालांना थंडगार पाणी किंवा बर्फ लावल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावून रक्तस्राव थांबायला मदत होते. रक्तस्राव थांबल्यावर उशी घेऊन उताणे निजून राहावे.

कारणे

- नाकाला जखम होणे
- कष्टाचं काम
- उच्च रक्तदाब
- उंचीवरच्या प्रदेशात जाणे
- नाक फार जोरानं शिंकरणे

नाकातून रक्त आल्यास काय करावे

- खाली बसावे
- थोडेसे पुढे झुकावे म्हणजे रक्त हे आपल्या घशात जाणार नाही
- थंड, ओला कपडा आपल्या नाकाखाली धरावा म्हणजे आपल्या नाकातील रक्तवाहिन्या आकुंचित होऊन रक्तस्राव थांबेल.
- रक्त हे एकाच नाकपुडीतून येत असेल तर, त्या नाकपुडीच्या वरच्या भागात घट्ट दाबून धरावे.
- दोन्ही नाकपुड्यांतून रक्त येत असेल तर, आपल्या नाकपुड्या किमान दहा मिनिटे दाबून धराव्यात.
- तरीही रक्तस्राव चालूच राहिल्यास, आणखी दहा मिनिटे दाब द्यावा.
- रक्तस्राव हा नाकाला थेट झालेल्या जखमेमुळं झाला असेल तर, केवळ हलकाच दाब द्यावा.
- जोरदार रक्तस्राव चालूच राहिल्यास किंवा नाकातून वारंवार चालू राहिल्यास, एखाद्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

आजमावून प्या जास्वंदीचा चहा

जास्वंदीच्या फुलाचे महत्त्व आपल्याकडे मोठे आहे. गणपती बाप्पाचे हे फूल आवडते आहेच, पण त्याशिवाय हे फूल उत्तम औषधी म्हणूनही वापरले जात असते. जास्वंदीची फुले आणि पाने खोबरेल तेलामध्ये कढवून हे तेल केसांना लावल्याने अकाली पांढरे झालेले केस पुनश्च काळे होतात, तसेच केसगळती थांबून केसांची चांगली वाढ होते. जास्वंदीची फुले वापरून बनवलेला चहा किंवा काढा देखील आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम समजला जातो. जास्वंदीची फुले भारतामध्ये बहुतेक ठिकाणी सहज उपलब्ध असून, हा चहामध्ये अनेक पौष्टिक तत्त्वे असून, यामध्ये कॅफीनचे प्रमाण नगण्य असते. या चहाच्या सेवनामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहून कोलेस्टेरॉलचे प्रमाणही नियंत्रणात राहते. या चहाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढत असून, चयापचय शक्तीदेखील सुधारते.

'हिबिस्कस टी' किंवा जास्वंदीचा चहा बनवण्यासाठी जास्वंदीच्या फुलांचा वापर केला जात असून, या चहाला फुलांप्रमाणेच लाल रंग येतो. या चहाची चव काहीशी आंबटसर असून, हा चहा गरम किंवा गार पिता येतो. या चहामध्ये अँटी ऑक्सिडंट्स आणि 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर आहे. या चहामध्ये लोहाची मात्रा ही मुबलक असून कॅफीनचे प्रमाण अतिशय कमी असल्याने फिटनेस शौकिनांसाठी या चहाचे सेवन लाभदायक ठरते. यामध्ये पोटॅशियम आणि 'अ' जीवनसत्त्वही आहे. या कारणास्तव या चहाचे सेवन दररोज करणे चांगले. अनेक देशांमध्ये आता या जास्वंदीचा चहा ग्रीन टीला पर्याय म्हणून सेवन केला जात आहे. हा चहा बनवण्यासाठी खास जास्वंदीच्या चहाच्या टी बॅग्ज बाजारामध्ये मिळतात, त्यांचा वापर केला जाऊ शकतो.



त्याशिवाय हा चहा घरी तयार करण्यासाठी दोन कप ताजी जास्वंदीची फुले किंवा अर्धा कप वाळवलेल्या जास्वंदीच्या फुलांची पावडर, आठ कप पाणी, पाव कप मध, तीन मोठे चमचे लिंबाचा रस इतक्या साहित्याची गरज आहे. जर चहा बनवण्यासाठी ताजी फुले वापरली जाणार असतील, तर या फुलांमधील तुरा काढून टाकावा.

त्यांतर ही फुले धुवून घेऊन आठ कप पाण्यामध्ये घालून हे पाणी उकळावे. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाण्याच्या भांड्यावर झाकण ठेवावे. हे झाकण पंधरा मिनिटे राहू द्यावे. त्यानंतर या पाण्यामध्ये लिंबाचा रस आणि मध घालून चांगले मिसळावे आणि मग हा चहा गाळून घ्यावा. हा चहा गरम किंवा थंड करून पिण्यास द्यावा. या चहाचे सेवन गर्भवती महिला, कर्करोगाचे उपचार घेणारे रुग्ण, कमी रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींनी कमी प्रमाणात करावे.

कम्फर्ट व्हर्सेस फॅशन, दोन्ही कसे मिळवाल?

'आरामदायीपणा सर्वात महत्त्वाचा' हे सर्वश्रुत आहे, परंतु जेव्हा स्त्रियांच्या फॅशनचा विषय येतो, तेव्हा एखादी गोष्ट निवडताना केवळ या एकाच गोष्टीचा विचार करून चालत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून ॲथलेअरचा ट्रेंड वाढत असताना, स्त्रिया दोन्ही गोष्टी मिळवून देण्याची १०० टक्के शक्यता असल्याचे सिद्ध करत फॅशनविरुद्ध कम्फर्ट असे वादविवादाचे अनेक मार्ग शोधत आहेत. जेव्हा त्या आरामदायी हा शब्द ऐकतात तेव्हा, त्यामध्ये लेगिंग्ज आणि घाम नेहमीच प्रथम गोष्टी असतात, परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो, तेव्हा, फॅशनचे समर्थक निःसंशयपणे अधिक सर्जनशील होतात.



आपण २१ व्या शतकात वास्तव्य करत आहोत, जेथे स्त्रिया सतत समाजात मिसळत असतात, वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनशैली आहेत आणि ही वेळ आपण आपल्या कपड्यांसह अधिक आरामदायक आणि फॅशनेबल निवड करण्याची. चांगली बातमी अशी आहे की, अलीकडच्या काळात लाऊंजवेअर खूप वर्षांनी आले आहेत. केवळ त्यामध्ये भरपूर पर्याय म्हणून नाहीत तर ते सैल, आरामदायी असे कपडे खरोखरच ट्रेंडमध्ये आहेत. आता आपल्या मैत्रिणींसह दिवसातून जास्तीत जास्त वेळा बाहेर फिरायला जाऊ शकता, तुम्ही आरामदायी वाटू शकेल ते ही विशेष काही न बदलता. जर आपण त्यांना 'जॉगर्स' म्हटले तर, तुम्ही त्यांना धावपट्टीवर स्वेटपॅन्टस म्हणून देखील घालू शकता. आपण ड्रेसिंगच्या सुवर्णयुगात राहत आहोत - एका आळशी मुलाचे फॅशन स्वर्ग. म्हणून, व्हिस्कोस त्याच्या गुणधर्मांसह उच्च श्वासोच्छ्वास, संपूर्ण जैव-विकृती आणि पर्यावरण अनुकूल अशा श्रेणीतील पसंतीची निवड ठरली आहे. व्हिस्कोसपासून बनवलेल्या कपड्यांचे हे सॉफ्ट टेक्स्चर आहे, ज्यामुळे त्यांना सहजपणे पोशाख करणे सोपे होते आणि आपल्याला पाहिजे असलेल्या शैलीत वापरणे सोपे होते. फॅब्रिकची फ्लुएडीटी शरीरावर ड्रेप करण्यास अधिक मदत करते, त्यामुळे फॅब्रिक अंगावर चमकण्यास मदत होते. कपड्यांसह लेअरिंग अत्यंत सोपे आहे, कारण याचा पोत कपड्याचा गोळा होऊ देत नाही. हे कोणत्याही फॅशनिस्टांसाठी असणे आवश्यक आहे. उज्ज्वल रंग आणि पेस्टल्स रंग ट्रेन्डमध्ये आहेत, त्यामुळे फॅब्रिकची रंगीत होणारी क्षमता आकर्षक बनवते.

थकवा दूर करण्यासाठी वापरा ग्रीन टी फेसपॅक



चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी घरगुती फेसपॅक सर्वोत्तम ठरतो. जेव्हा स्कीन थकलेली किंवा डल वाटत असेल तेव्हा तांदूळ आणि ग्रीन टीचा घरी तयार केलेला फेसपॅक स्किनला रिलॅक्स होण्यास मदत करेल. बघू कसा तयार करायचा हा पॅक...

- **सामग्री :** लिंबू, ग्रीन टी, २-३ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेल.
- **कृती :** एका वाडग्यात २ चमचे तांदळाचे पीठ घेऊन त्यात १/४ चमचा लिंबाचा रस मिसळा. त्यात ताजी ग्रीन टी मिसळा. क्रीमसारखं होईपर्यंत मिसळत राहा. आता या पॅकमध्ये ३ ते ४ थेंब पेपरमिंट किंवा टी ट्री तेलाचे मिसळा.
- **लावण्याचा विधी :** आपला चेहरा कोमट पाण्याने धुऊन घ्या. मग चेहरा आणि मानेवर पॅक लावा. २० मिनिटानंतर पॅक धुऊन टाका. चेहरा पुसून मॉइश्चरायझर लावा.

जिरे आरोग्यासाठी लाभदायक



जिरे एक मसल्यातील पदार्थ आहे. जेवणाला रुचकर चव आणण्यात जिऱ्याचा वाटा मोठा असतो. जिरे केवळ खाण्यासाठी मर्यादित नाही, तर आपल्याला आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. जिऱ्याचा उपयोग औषध म्हणून केला जात आहे. जिऱ्यामध्ये लोह, मॅग्नेशिअम, कॅल्शियम, फायबर, झिंक आदींची जास्त मात्रा असते. मेक्सिको, भारत, नार्थ अमेरिका या देशांत जिऱ्याचा जास्त वापर केला जातो. शरीरातील अनावश्यक चरबी बाहेर काढण्यास जिरे मदत करते. तसेच जिरेपूड खाल्ल्यानंतर एक तास काहीही खाऊ नका.

- दह्यात भाजलेल्या जिऱ्याचे चूर्ण घालून खाल्ल्यास डायरियावर आराम मिळतो.
- जिऱ्यात लिंबाचा रस आणि मीठ घाला. त्यामुळे उलटीसारखे वाटणे, मळमळणे यावर आराम मिळेल.
- जिऱ्यात थोडे व्हिनेगर घालून खाल्ल्यास उचकी बंद होते.
- जिऱ्यात गूळ घालून त्याच्या गोळ्या बनवा. त्या मलेरियावर लाभदायी ठरतात.
- एक चिमूटभर कच्चे जिरे खाल्ल्याने ॲसिडीटीपासून सुटका होते.
- मधुमेह नियंत्रित ठेवण्यासाठी एक छोटा चमचा जिरे दिवसातून दोनदा पाण्यासोबत घ्या. नक्कीच फायदा होईल.

या कारणांमुळे लीक होतो फोनमधील डेटा, या चुका टाळाच

आजकाल डेटा लीकच्या घटना वारंवार ऐकण्यात येत असतात. अनेक प्रकारे डेटा लीक होत आहे. कधी फेसबुकचा डेटा लीक होतो, तर कधी कोणत्यातरी शॉपिंग साइटचा. एवढेच नाही, तर तुमच्या स्मार्टफोनचा खासगी डेटा जसे की फोटो, व्हिडीओ किंवा कोणतीही गोपनीय फाइलही लीक होऊ शकते. याचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे डेटा लीक झाल्यानंतर तुमची वैयक्तिक माहिती आणि ई-मेल आयडी, पासवर्ड, मोबाइल नंबर इत्यादी हॅकर्सपर्यंत पोहोचतात. नंतर हॅकर्स फोरमसारख्या डार्क वेबवर डेटा विकला जातो किंवा याच्या मदतीने वैयक्तिक ब्लॅकमेलही करता येते. तुम्हीही अँड्रॉइड स्मार्टफोन वापरत असाल तर तुमचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तुम्ही काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून भविष्यात तुम्हाला कोणतीही अप्रिय घटना टाळता येईल. चला जाणून घेऊया.

या कारणांमुळे डेटा लीक होतो

कोणत्या चुकांमुळे तुमचा वैयक्तिक डेटा लीक होतो हे माहीत असणे महत्त्वाचे आहे. अनेकदा असे दिसून येते की, आपण आपले कोणतेही वैयक्तिक फोटो, व्हिडीओ किंवा फाइल्स आणि पासवर्ड आपल्या मित्र आणि नातेवाईकांसोबत शेअर करतो. जर त्यांनी तुमचा डेटा आणखी एखाद्या व्यक्तीकडे हस्तांतरित केला, तर तुमचा डेटा लीक होऊ शकतो. तसेच बऱ्याच वेळा आम्ही घाईघाईने किंवा लक्ष न देता प्रामाणिक स्त्रोतांकडून थर्ड पार्टी ॲप्स इन्स्टॉल करणे टाळावे. यामुळे ॲप्स स्पायवेअरने लोड केले जाऊ शकतात आणि तुमची वैयक्तिक माहिती हॅकर्सच्या समोर आणू शकतात.

डेटा लीक टाळण्यासाठी या पद्धती फॉलो करा

तुमच्या स्मार्टफोनला डेटा लीकपासून वाचवण्याचा सर्वात सोपा आणि महत्त्वाचा मार्ग म्हणजे तुमचा फोन लॉक ठेवणे. यासोबतच ॲपलॉकच्या मदतीने फोनमधील ॲप्स विशेषतः गॅलरी आणि फाइल मॅनेजर सुरक्षित ठेवा. ॲप फक्त गूगल प्ले स्टोरवरून इन्स्टॉल करा. तसेच ॲप स्थापित करण्यापूर्वी त्याचे रेटिंग आणि रिव्ह्यू नक्की वाचा. थर्ड पार्टी ॲप्स वापरणे टाळा. बऱ्याच वेळा या ॲप्समध्ये स्पायवेअर आणि मालवेअर असतात, जे तुमचा फोन स्कॅन करत राहतात आणि तुमची वैयक्तिक माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचवण्यासाठी बॅकग्राऊंडमध्ये काम करतात.



फोनमध्ये फक्त आवश्यक ॲप इन्स्टॉल करण्याचा प्रयत्न करा आणि जेव्हा शंका असेल तेव्हा लगेच ॲप काढून टाका. फोनवरील कोणत्याही अज्ञात लिंकवर क्लिक करू नका. हॅकर्स किंवा स्कॅमर अनेकदा ई-मेल किंवा एसएमएसद्वारे मालवेअरने भरलेल्या लिंक्स पाठवतात. लिंक क्लिक करताच तुमच्या फोनची हेरगिरी सुरू होते.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, ०२ सप्टेंबर ते ०८ सप्टेंबर २०२५

संपादकीय

सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच राष्ट्राला संबोधित करताना या वर्षाअखेर देशातील पहिली सेमीकंडक्टर चिप उत्पादित होणार असल्याची घोषणा केली. आतापर्यंत परदेशातून सेमीकंडक्टर आयात करून भारताची गरज भागविली जात होती. दहा वर्षांत सेमीकंडक्टर उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याचा भारताचा निर्धार असून सेमीकंडक्टर निर्यात करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना देश सेमीकंडक्टरच्या जगात पुढे जात आहे, असे सांगितले. देशात सहा सेमीकंडक्टर युनिट्स आधीच कार्यरत आहेत, तर इतर चार मंजूर झाले आहेत. २०२५च्या अखेरीस ह्यमेड इन इंडिया ह्यसेमीकंडक्टर चिप्सह्ण बाजारात येतील. सेमीकंडक्टर चिप्ससाठी देशांमध्ये अनेकदा संघर्ष होतो. अशा परिस्थितीत सेमीकंडक्टर चिप म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हा एक सिलिकॉन-आधारित इलेक्ट्रॉनिक घटक आहे, जो कोणत्याही उपकरणाच्या प्रक्रियेत आणि मेमरी स्टोरेजमध्ये वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर फोनमध्ये स्थापित केलेली मेमरी चिप त्याचाच एक प्रकार आहे.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सेमीकंडक्टर चिप्स लहान असूनही खूप उपयुक्त आहेत. त्याशिवाय कोणतेही गॅझेट काम करू शकत नाही. ते मोबाइल, लॅपटॉपपासून वाहन, संरक्षण आणि उपग्रह क्षेत्रात वापरले जाते. तैवान जगात सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स बनवतो. या देशातील टीएसएमसी या कंपनीचा चिप मार्केटमध्ये सुमारे ५० टक्के वाटा आहे. मेमरी चिप्स बनवणारी दक्षिण कोरिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. सॅमसंग, एसके हायनिक्स यांसारख्या कंपन्या यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. चीनदेखील हळूहळू या क्षेत्रात प्रगती करत आहे. ह्यमीडिया रिपोर्टसह्णनुसार सेमीकंडक्टर चिप्सच्या एकूण उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १५-२० टक्के आहे. चिपचा शोध अमेरिकेने लावला होता; परंतु आजकाल बहुतेक आशियाई देश त्याचे उत्पादन करत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकादेखील या क्षेत्रात सतत गुंतवणूक करत आहे.

सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स खरेदी करणाऱ्या देशांच्या यादीत पहिले नाव चीनचे आहे. जे त्याच्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेसाठी एकूण जागतिक खरेदीपैकी एक तृतीयांश खरेदी करते, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत त्याच्या गरजेनुसार इतर देशांकडून लागणारे शंभर टक्के सेमीकंडक्टर खरेदी करतो. त्यात तैवान हा सर्वात मोठा पुरवठादार आहे. त्यानंतर चीन, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आणि मलेशियाचा क्रमांक लागतो. एका अहवालानुसार भारत स्वतः सेमीकंडक्टर निर्यात करतो. २०२४-२५ दरम्यान भारत अमेरिकेला चिप्स निर्यात करणारा चौथा देश आहे, ज्याचा अमेरिकेच्या एकूण सेमीकंडक्टर आयातीत ७.२ टक्के वाटा आहे. भारत अर्धवाहक उत्पादन आणि नवोपक्रमाचे जागतिक केंद्र बनण्याचे स्वप्न पाहतो, जेणेकरून आयात कमी होईल आणि पुरवठा साखळी मजबूत होईल आणि देशांतर्गत क्षमता वाढेल. सरकारने सेमीकॉन इंडिया प्रोग्राम अंतर्गत या क्षेत्रात सुमारे ७६ हजार कोटी रुपये जारी केले आहेत. आतापर्यंत देशात दहा प्रमुख अर्धवाहक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, जिथे ६ प्लांटवर काम सुरू आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, एचसीएल-फॉक्सकॉन, मायक्रॉन, वेदांत-फॉक्सकॉन आणि अनेक जागतिक तंत्रज्ञान कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत २०२५च्या अखेरीस मेड इन इंडिया सेमीकंडक्टर चिप्स लाँच करण्याची तयारी करत आहे. भारत सरकार सेमिकॉन इंडिया फ्युचर स्किल्स टॅलेंट कमिटी च्या अहवालाकडे लक्ष ठेवून आहे. त्यात म्हटले आहे, की २०३२ पर्यंत व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेशन चिप डिझाइन क्षेत्रात अंदाजे २,७५,००० अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. इतकेच नाही तर, पुढील दहा वर्षांमध्ये फॅब आणि असेंब्ली, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग सुविधांसाठी अनुक्रमे २५ हजार आणि २९ हजार कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. ज्याची अंमलबजावणी करण्यास सरकार तयार आहे. दरवर्षी १५ लाखांहून अधिक अभियंत्यांना प्रशिक्षण दिले जाते.

भारतीय अर्धवाहक उद्योगाची सद्यस्थिती आणि भविष्यातील शक्यतांवरील हा अहवाल अलीकडेच कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लाँच केला. अहवालात दावा करण्यात आला आहे, की भारतात दरवर्षी १.५ दशलक्षाहून अधिक अभियंते प्रशिक्षित केले जातात. त्यापैकी तीन टक्क्यांपेक्षा कमी अर्धवाहक उद्योगासाठी कुशल मानले जातात. तथापि, गेल्या काही वर्षांमध्ये भारताने चिप डिझाइनमध्ये बरीच प्रगती केली आहे, परिणामी सव्वा लाखांहून अधिक अभियंते डिझाइन सेवांमध्ये गुंतले आहेत,

तरीही फॅब ऑपरेटर, प्रक्रिया तंत्रज्ञ आणि एटीएमपी अभियंत्यांची मोठी कमतरता आहे. संपूर्ण अर्धवाहक मूल्य साखळीसाठी हे कौशल्य आवश्यक आहे. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि अर्धवाहक उद्योग त्यात खूप मोठी भूमिका बजावू शकतो. भारतीय सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२० मध्ये १५ अब्ज डॉलर्स होती. २०२५ पर्यंत ती ६४ अब्ज डॉलर्स तर २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ती जागतिक मागणीच्या सुमारे दहा टक्के आहे. कौशल्य विकास तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे की सेमीकंडक्टर उद्योगासाठी कोणालाही तयार करण्यासाठी विविध विषयांमध्ये मजबूत पाया आवश्यक आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञानाच्या मूलभूत गोष्टी समजून घेऊन, विद्यार्थी अर्धवाहक उपकरणे, उत्पादन प्रक्रिया, डिझाइन तंत्रे एक्सप्लोर करण्यासाठी तयार होऊ शकतो. नॅनोटेक्नॉलॉजी, मटेरियल सायन्स आणि सर्किट डिझाइन यांसारख्या विशिष्ट क्षेत्रातही हळूहळू पुढे जाऊ शकतो. या धोरण अहवालात, तज्ज्ञांनी शालेय स्तरावरूनच काही तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे सुचवले आहे. हे विविध मंत्रालयांशी संबंधित असल्याने, कौशल्य विकास मंत्रालय या सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने या धोरणावर आणि रोडमॅपवर पुढे जाण्यासाठी पुढाकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी सेमीकंडक्टर आहेत आणि चिप्सची जागतिक मागणी गगनाला भिडत आहे; परंतु काही मर्यादित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यामुळे पुरवठा साखळी खूपच नाजूक आहे. भारत या संदर्भात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येत आहे. मेक इन इंडिया अंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग , इंडिया सेमीकंडक्टर मिशन आणि सेमीकॉन इंडिया प्रोग्राम यांसारख्या प्रमुख क्षेत्रांपैकी एक म्हणून उपक्रमांनी उद्योगाला आधार देण्यासाठी एक परिसंस्था तयार करण्यास मदत केली आहे.

नोएडा आणि बेंगळुरू येथे दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर डिझाइन सुविधा केंद्रांचे उद्घाटन झाले. ही भारतातील पहिली केंद्रे प्रगत ३ नॅनोमीटर चिप डिझाइनवर लक्ष केंद्रित करतात. देशाच्या सेमीकंडक्टर इनोव्हेशन प्रवासात हा महत्त्वाचा टप्पा ठरेल. मंत्रालयाच्या डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजनेअंतर्गत समर्थित स्टार्टअप्स आणि त्यांच्या चिप्स टू स्टार्टअप्स कार्यक्रमात लक्षणीय वाढ होत आहे. अलीकडेच स्मार्ट व्हिजन , सीसीटीव्ही कॅमेरे आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज सारख्या अनुप्रयोगांसाठी चिप्स बनवणाऱ्या नेत्रासेमी या स्टार्टअप कंपनीला सरकारच्या चिप डिझाइन योजनेंतर्गत १०७ कोटी रुपयांची व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक मिळाली. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार २०२२ मध्ये डीएलआय योजना सुरू झाल्यापासून सरकारने २२ कंपन्यांना चिप डिझाइन प्रकल्पांसाठी २३४ कोटी रुपयांची मदत देण्याचे वचन दिले होते. त्याचा एकूण प्रकल्प खर्च ६९० कोटी रुपये आहे. एकत्रितपणे या स्टार्टअप्सनी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूकदारांकडून ३८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला आहे. याव्यतिरिक्त, पाच स्टार्टअप्सनी जागतिक चिप उत्पादकांसह त्यांचे चिप डिझाइन आधीच तयार केले असून त्यांची चाचणी केली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार ७२हून अधिक कंपन्यांना चिप्स डिझाइन करण्यास मदत करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअर साधनांची उपलब्धता प्रदान करण्यात आली आहे.

हेकेखोरपणा ही एक मानसिकता



अनेकदा आपल्या आजूबाजूलासुद्धा आपण असे लोक बघतो जे कायम स्वतःच खरं करतात. अगदी कोणीही कितीही अनुभवी व्यक्तीने सल्ला दिला, मार्गदर्शन केले तरी काही व्यक्ती ते समजून उमजून घेण्याच्या मानसिकतेतच नसतात. अशा लोकांना स्वतःला स्वतःच्या चुकांचा, अविचारी निर्णयांचा खूप त्रास होतो पण विनाशकाले विपरीत बुद्धी या उक्तीनुसार नुकसान होत असलं तरी ते अजिबात स्वतःमध्ये बदल करत नाहीत. एकदा आजूबाजूच्या सगळ्यांना असे भावनिक, मानसिक ब्लॅकमेल करून आपला कोणताही अट्टाहास पचू शकतो हे सिद्ध झाल्यावर ही व्यक्ती खूप आत्मविश्वासाने स्वतःच्या चुकांचे प्रमाण वाढवत नेते. अशा व्यक्तींच्या चुकांमुळे, चुकीच्या व्यवहारामुळे, वागण्यामुळे त्याचे स्वतःचे शारीरिक मानसिक स्वास्थ्य हरवतेच पण असे लोकं यासाठी मी जबाबदार आहे असं मान्य न करता वेळोवेळी कोणाचेही नाव पुढे करून त्याच्यावर आपल्या अपयशाच खापर फोडतात. हेकेखोरपणा अशा स्वभावामागील मानसिकतेचे सविस्तर कारण आणि त्यांच्या स्वभावामागे असलेल्या घटना या लेखामार्फत आपण जाणून घेणार आहोत. मी म्हणतो तेच खरं अशा व्यक्तींच्या स्वभावात अनेक गुंतागुंतीची मानसशास्त्रीय कारणे दडलेली असू शकतात. बाह्यतः ही व्यक्ती हट्टी, दुर्लक्ष करणारी किंवा अहंकारी वाटू शकते. अशा व्यक्तीमध्ये काही ठरावीक मानसिक वैशिष्ट्ये दिसून येतात ते म्हणजे असुरक्षितता आणि भीती हा एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. अशा लोकांच्या मनात एक प्रकारची खोलवर रुजलेली असुरक्षितता असते. त्यामुळे, कोणत्याही कोणाच्याही सल्ल्याला किंवा मार्गदर्शनाला ते स्वतःवरचा हल्ला मानतात आणि त्याला विरोध करतात. त्यांच्या मते, दुसऱ्याचे मार्गदर्शन स्वीकारणे म्हणजे स्वतःची कमी कबूल करण्यासारखं आहे. दुसरे म्हणजेच नियंत्रण गमावण्याची भीती यांच्यामध्ये असते. दुसऱ्यांनी दिलेला सल्ला स्वीकारणे म्हणजे आपल्या आयुष्याचा ताबा दुसऱ्यांच्या हातात देण्यासारखं त्यांना वाटतं. ही नियंत्रण गमावण्याची भीती इतकी जास्त असते की, चुकीच्या मार्गावर असूनही ते स्वतःच्याच निर्णयावर ठाम राहतात. 'सत्य' आणि 'मी' यांची एकरूपता हा एक पैलू अशा लोकांमध्ये आढळतो. अशा व्यक्तीसाठी 'सत्य' हे त्यांच्या स्वतःच्या विचारांशी आणि कृतींशी जोडलेलं असतं. त्यांच्या मते, 'मी जे करतोय तेच बरोबर आहे' आणि 'मी जो आहे तोच बरोबर आहे'. त्यामुळे, त्यांच्या विचारांना किंवा कृतींना आव्हान देणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वालाच आव्हान देणे होय. जर कोणी त्यांच्या मताला, विचारांना, निर्णयाला आडवं गेलं, विरोध केला, त्यांना जे आवडत नाही, पटत नाही ते केल तर हे लोक त्यांच्याशी संपर्क तोडतात. त्यांच्या मनाविरुद्ध वागणारी जितकी लोक असतील त्यांच्यामध्ये फूट पाडण्यासाठी हे पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या भूमिकेच्या आड येणारे आपले शत्रू आहेत, विरोधक आहेत अशी त्यांची मानसिकता असते आणि त्यामुळे आपल्या विरोधात अनेक लोकांचे एकमत होऊ नये आणि आपल्यावर सामूहिक हल्ला आपल्या वागणुकीविरोधात होऊ नये यासाठी ते पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या प्रत्येकाला ते आपला शत्रू मानत असल्यामुळे त्याची इतरांमध्ये बदनामी करणे, त्याच्या बद्दल अफवा पसरवणे, गटबाजी करणे, एखाद्याला एकटे पाडणे, त्याला टार्गेट करणे यातून हे लोकं स्वतःच्या चुकांना झाकण्याचा प्रयत्न करतात.चुका स्वीकारण्याची अक्षमता हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा या लोकांना कोणत्याही थराला नेण्यासाठी कारणीभूत असतो. आपल्या चुका मान्य करणे हे एक प्रकारचं मानसिक धैर्य आहे. पण, अशा व्यक्तीमध्ये हे धैर्य नसतं. त्यांना असं वाटतं की चूक स्वीकारणे म्हणजे पराभव स्वीकारणे. स्वतःला आणि इतरांना त्रास झाला तरी, ते या गोष्टी गांभीयार्ने घेत नाहीत कारण त्यांना हे मान्य करायचं नसतं की त्यांची कृती, त्यांचा निर्णय चुकीचा होता. ते अनेक गंभीर गोष्टी उडवून लावतात, जेणेकरून त्यांना आपल्या चुकीचा सामना करावा लागणार नाही. आपल्या चुकीकडे कोणाचे लक्ष जाण्याअगोदर ते या चुकीचं खापर फोडण्यासाठी एखादा बळीचा बकरा शोधून ठेवतात. त्यांच्या नियंत्रणाबाहेर कोणतीही गोष्ट जाते आहे अस लक्षात आल्यास हे लोक ताबडतोब एखादी मन घडत कहाणी रचून इतरांच्या गळी उतरवतात आणि स्वतःची बाजू सुरक्षित करतात. अशा प्रकारच्या मानसिकतेची पाळे मुळे त्या व्यक्तीच्या बालपणात किंवा तिच्या मागील अनुभवांमध्ये दडलेली असू शकतात त्यावर नजर टाकणे गरजेचे आहे. बालपणीचे आघात यामागील जटील कारण आहे. काही व्यक्तींना बालपणी खूप टीका किंवा अपमान सहन करावा लागला असेल तर असे होऊ शकते. त्यांच्यावर वारंवार टीका झाल्यामुळे त्यांच्या मनात 'मी कधीच पुरेसा नाही' अशी भावना निर्माण होते. या भावनेपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी ते एक बचावात्मक कवच तयार करतात, ज्यामुळे ते कोणाचंही ऐकत नाही. आपलंच खरं करून स्वतःला कायम बरोबर आणि खरं सिद्ध करणे त्यांच्यासाठी रोजची लढाई असते. कमी 'आत्मसन्मान' असणे. कमी आत्मसन्मान असणाऱ्या व्यक्तींना असं वाटतं की ते चुकीचे आहेत किंवा कमी आहेत. या असुरक्षिततेतून बाहेर पडण्यासाठी ते स्वतःलाच श्रेष्ठ मानू लागतात. दुसऱ्यांचा सल्ला नाकारून ते तात्पुरती श्रेष्ठत्वाची भावना अनुभवतात. ही एक प्रकारची मानसिक भरपाई असते. कोणाचं काही ऐकून घेणे त्यांना कमीपणा वाटतो. 'नार्सिसिस्टीक व्यक्तिमत्त्वविकार'देखील अशी व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी कारणीभूत असतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये, हे वर्तन 'नार्सिसिस्टीक व्यक्तिमत्त्व विकारा'शी संबंधित असू शकतं. या विकारात, व्यक्तीला स्वतःबद्दल खूप जास्त महत्त्व वाटतं. त्यांना असं वाटतं की ते अद्वितीय आहेत आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ आहेत. आपल्या आजूबाजूचे सगळे मूर्ख आहेत त्यांना काहीही सांगून दिशाभूल करणे सोपे आहे. या वृत्तीमुळे त्यांना कोणाच्याही सल्ल्याची गरज वाटत नाही. दुसऱ्यांच्या भावना किंवा त्रासाची त्यांना पर्वा नसते, कारण त्यांच्यासाठी फक्त स्वतःचे विचार, हट्ट आणि गरजा महत्त्वाच्या असतात. आपल्या नियमानुसार जग चालले पाहिजे ही त्यांची हटवादी वृत्ती असते. जो आपलं अंधानुकरण करत नाही, जे लोक एकमेकांना विश्वासात घेवून आपल्या कोणत्याही गोष्टीला विरोध करतात त्यांना वाटते त्या लोकांना फोडण्यासाठी, तोडण्यासाठी, वेगळे करण्यासाठी असे लोक वेगवेगळ्या पद्धतीने, प्रकाराने प्रयत्न करतात. 'संरक्षण यंत्रणा' अशा व्यक्ती वारंवार काही विशिष्ट संरक्षण यंत्रणांचा वापर करतात. जसे की 'नकार'. ते समस्या अस्तित्वातच नाहीये असं मानतात, जेणेकरून त्यांना त्या समस्येचा सामना करावा लागणार नाही. तुम्ही ज्या गोष्टीला समस्या किंवा त्रास म्हणत आहात तो माज्या लेखी त्रास नाहीच आहे कोणतीही समस्या नाहीच आहे असं ते इतरांना पटवून देतात. कोणतीही चुकीची घटना घडल्यावर पण हे असे झालेच नव्हतेच हे माज्यामुळे नाही झाले याला कारणीभूत भलतीच व्यक्ती होती. या पद्धतीने पटवून देण्यात हे लोक माहीर असतात. जे कोणी अशा लोकांना काही गंभीर चुकांचे, घटनांचे भविष्यात होणारे गंभीर परिणाम लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतो त्याला हे लोक वेसण घालण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांकडून अनेकदा त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना खूप मयार्दा घातल्या जातात, बंधनात ठेवले जाते, इतरांवर लक्ष आणि नजर ठेवली जाते. इतरांचे वागणे, बोलणे कंट्रोल करून इतरांमध्ये फूट पाडून ही व्यक्ती स्वतःला सुरक्षित समजते. प्रत्येकजण माज्याच बाबतीत माज्या मागे काहीतरी बोलेल, माज्याबद्दलच चर्चा होईल, माज्या विरुद्ध काही नियोजन अथवा कट केला जाईल ही भीती अशा लोकांना कायम वाटत असते. मी जे करत नाही, मला जे आवडत नाही ते तुम्हीही करू नका, मला जे पटत नाही ते कोणीच करायचं नाही अशी त्यांची अपेक्षा असते. मला जे अपेक्षित नाही त्याबद्दल कोणी आपापसात बोलायच पण नाही यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. अशा व्यक्तीचा स्वभाव केवळ 'हट्टीपणा' नसून त्यामागे खोलवर रुजलेली असुरक्षितता, भीती आणि मानसिक आघातांशी संबंधित जटिल भावना असू शकतात.

हे वर्तन त्यांचे आंतरिक जग सुरक्षित ठेवण्याचा एक मार्ग असतो, भलेही त्यामुळे त्यांना आणि इतरांना त्रास होत असला तरी. अशा व्यक्तीला मदत करण्यासाठी, तिच्या वर्तनाला केवळ 'चुकीचे' ठरवण्याऐवजी, त्यामागची खरी कारणे समजून घेणे महत्त्वाचे असते. अशा व्यक्ती, अशा मानसिकतेमधून जाणारी कुटुंब यांच्यासाठी समुपदेशन, एकमेकांशी मोकळा संवाद साधने, सतत बोलत राहणे, परस्परांना समजावून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या बाबतीत असे कोणी करत असेल अथवा घडतं असेल तर वेळीच जागे होणे, कोणाच्याही खोट्या रचलेल्या मिथ्या ना बळी न पडणे, अशा लोकांच्या सांगण्यावरून आपल्या संपकार्तील चांगली जवळची माणस न गमावणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा

मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत. त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. आपल्याकडे अपेक्षेप्रमाणे मोबाइलच्या अतिवापरा संदर्भातील दुष्परिणामाबाबत जनजागृती होत नाही. ती होणे गरजेचे आहे. पल्या लोकशाहीप्रधान भारत देशाचा १५ ऑगस्ट २०२५ रोजी ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहाने आणि विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. म्हणजे आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे पूर्ण झाली. मात्र मोबाइलचा विचार करता वैज्ञानिक युगात वावरणारे आजचे विद्यार्थीवर्ग मोबाइलचा अतिवापर करताना दिसत आहेत. मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची विचार करण्याची शक्ती हळूहळू कमी होते. काही वेळा आपण काय करावे आणि काय नाही याची कल्पना मुलांना येत नाही. त्यात ते कधी कधी गोंधळून जातात. हे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. तेव्हा देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य वर्षापासून मोबाइलचा अतिवापर करणार नाही यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे तर आपण सर्वजणांनी आज वचनबद्ध होऊया. मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. ही त्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून धोक्याची घंटा आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत त्यामुळे त्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळावा. मोबाइलचा वापर आवश्यक कामासाठीच करण्यात यावा. सध्या तरी विद्यार्थ्यांना मोबाइलचे व्यसन लागले आहे. कायम त्यांच्या हातात मोबाइल दिसतो, तो दूर ठेवणे आवश्यक आहे. याचा परिणाम त्यांच्या डोळ्यांना त्रास होणे, झोप न लागणे, मानसिक दडपण, मन चलबिचल होणे, थोरांचे ऐकायचे नाही, मनमानी कारभार, मान व पाठ दुखी अशा अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. काही मुले तर झोपेत सुद्धा हातात मोबाइल धरून झोपतात. त्यात काही उशीच्या खाली लपवून मोबाइल ठेवतात. डॉक्टर सांगतात, आपण झोपताना मोबाइल दूर ठेवावा, याचे काय? तेव्हा देशातील सुजाण नागरिकांनी विचार करून उद्यापासून म्हणण्यापेक्षा आजपासून मोबाइलला दूर ठेवून योग्य ती काळजी घेतली पाहिजे. आजच्या युगात मोबाइल ही मूलभूत गरज झाली असली तरी त्याचा अतिवापर टाळावा. तेव्हा यात इतरांना दोष देण्यापेक्षा आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. मात्र हल्ली काही मुले आई-वडिलांचे ऐकत नाहीत. तुम्हाला काय कळते? असा प्रती सवाल आपल्या आई-वडिलांना करतात. तेव्हा घरात भांडण नको म्हणून आई-वडील दुर्लक्ष करतात. अलीकडे तर मोबाइलचा विचार करता मोबाइलच्या अतिवापरामुळे मुलांची पुरेशी झोप होत नाही. म्हणजे कारण नसताना जागरण होते. हे जागरण आरोग्याला अपायकारक असते. याऐवजी एखादा खेळ खेळणे गरजेचे आहे. म्हणजे तेवढा ताण डोळ्यांवर येत नाही. म्हणूनच आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करावा म्हणजे मोबाइलचा वापर कमी होईल किंवा मोबाइल वापरण्यावर मर्यादा येईल. ही आरोग्यासाठी चांगली बाब आहे. मी आवश्यक कामासाठी मोबाइलचा वापर करीन असे प्रत्येकांनी ठरविले पाहिजे. तसेच मोबाइलवर जास्त न बोलता आवश्यक तेवढेच बोलेन असे ठरवावे. त्यासाठी प्रत्येकांनी वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. केवळ मोबाइलवर वेळ घालविण्यापेक्षा आपल्या कुटुंबीयांसमवेत व मित्रांसोबत काही वेळ गप्पागोष्टीत घालवावा. तेवढे मन मोकळे होते. महत्त्वाची बाब म्हणजे, अशांसोबत मनमोकळेपणाने वेळ घालवावा, यातूनच खरी ऊर्जा मिळते. आजच्या तरुणाईला अशा गप्पागोष्टींची गरज आहे. तेव्हा मोबाइलच्या वापरावर स्वतःहून निर्बंध घातले पाहिजेत. उदाहरणार्थ सकाळी चहा, नाश्ता, जेवण करताना मोबाइलवर बोलू नये. तसेच झोपल्यावर मोबाइल आपल्यापासून दूर ठेवावा. केवळ मोबाइल एके मोबाइल नको तर आपल्याला मनोरंजनाकडे सुद्धा लक्ष द्यावे लागेल. मनोरंजनामुळे आपले मनोरंजन होत असते, त्याचप्रमाणे मन सुद्धा मोकळे झाल्याने कोणत्याही प्रकारचे दडपण येत नाही. तेवढा डोळ्यांना सुद्धा आराम मिळतो. एखाद्या विषयावर एकमेकांशी सुसंवाद साधावा म्हणजे तेवढीच आपल्या ज्ञानात भर पडत असते. त्यात अधिक आराम हवा असेल तर काही काळ मोबाइल बंद करून ठेवल्यास अधिक चांगले. मात्र कामात अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी. काही वेळा आपल्या कुटुंबाचा सल्ला घ्यायला काहीच हरकत नाही. त्याचे पालन करणे आपल्या हातात आहे. चांगल्या सल्ल्यामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. कारण घरगुती सल्ला हा अनुभवातून व मोफत असतो, हे विसरता कामा नये. मोबाइलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, ०२ सप्टेंबर ते ०८ सप्टेंबर २०२५

लालबागचा राजा मंडळाला अन्नछत्रासाठी परवानगी नाकारली

मुंबई, लालबागचा राजा मंडळाने यंदापासून दर्शनाला येणाऱ्या सर्व भक्तांना जेवण देण्याचे ठरवले होते. मात्र मुंबई महापालिकेने या अन्नछत्रासाठी परवानगी नाकारल्यामुळे यंदा मंडळाचा हा उपक्रम होऊ शकणार नाही. पेरू कंपाऊंड येथे अन्नछत्रासाठी उभारलेल्या मंडपाला मुंबई महापालिकेने नोटीस बजावली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी हा उपक्रम बंद करावा लागला. लालबागचा राजा मंडळाच्या गणपतीचे दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून या भक्तांच्या सोयीसाठी यंदा मंडळाने जेवणाची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र पहिल्याच वर्षी या उपक्रमाला परवानगी मिळू शकली नाही. लालबागचा राजा मंडळाला गणेशोत्सवाच्या काळात सुमारे लाखो भाविक भेट देतात. त्यापैकी नवसाच्या रांगेत तासनतास उभे राहणाऱ्या भाविकांसाठी मंडळातर्फे खाद्य पदार्थ दिले जातात. यंदा सर्वच भाविकांना प्रसाद म्हणून जेवण देण्याचा निर्णय



लालबागचा राजा मंडळाने घेतला होता. त्याकरीता पेरु कंपाऊंड येथील मोकळ्या जागेत भव्य मंडप उभ्यारण्यात आला होता. मात्र भक्तांची सुरक्षा लक्षात घेता मुंबई पोलिसांनी व अग्निशमन दलाने या अन्नछत्राला परवानगी देण्यास नकार दिला होता. तेथे चेंगराचेंगरी सदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. या कारणास्तव अन्नछत्राला परवानगी देण्यास अग्निशमन दलाचा व पोलिसांचा नकार होता. मात्र मंडप उभारलेला असल्यामुळे मुंबई महापालिकेच्या एफ दक्षिण विभागाने पेरु कंपाऊंड येथील जागेच्या मालकाला नोटीस बजावली होती. २४ तासात अन्नछत्र काढावे अन्यथा कारवाई करून काढण्यात येईल असा इशारा या नोटीशीतून देण्यात आला आहे. पेरु कंपाऊंडची ही जागा सध्या एका विकासकाच्या ताब्यात आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाने या विकासकाला नोटीस बजावली आहे. मुंबई महानगरपालिका कायदा, १८८८ मधील कलम ३५१(१) नुसार ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यात जागेवरील तात्पुरते बांधकाम, साहित्य, यंत्रसामुग्री, साधने, उपकरणे, मालमत्ता काढून टाकण्याबाबत ही नोटीस आहे. दरम्यान, लालबागच्या राजा मंडळाने या अन्नछत्रासाठी मोठे नियोजन केले होते. रोज सुमारे लाखभर लोकांना जेवण देता येईल अशी यंत्रसामुग्री, मनुष्यबळ ठेवण्यात आले होते. एकावेळी पाचशेपेक्षा अधिक लोक जेवू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली होती. मात्र मुंबई महापालिकेच्या नोटीसीमुळे हे अन्नछत्र यंदा होऊ शकणार नाही. याबाबत मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

पप्पाने मम्मीचे हात-पाय बांधले, रॉकेल ओतलं अन् लायटरने..



नवी मुंबई, एका व्यक्तीने विवाहबाह्य संबंधाच्या संशयावरून आपल्या 32 वर्षीय पत्नीला जाळून मारल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने या प्रकाराला पत्नीने स्वतःचा जीव घेतला असं दाखवण्याचा प्रयत्नही केला. मात्र, त्याच्या सात वर्षांच्या मुलीने पोलिसांना सारं स्पष्टपणे सांगितले. तिच्या वडिलांनी तिच्या आईला जाळलं, असं या चिमुकलीने सांगितलं. तेव्हा त्याचा खोटारडेपणा उघड झाला.

आरोपी पतीला अटक

25 ऑगस्ट रोजी पहाटे उरण परिसरातील पागोटेगाव येथे ही घटना घडल्याची माहिती आहे. याप्रकरणी 35 वर्षीय आरोपीला दुसऱ्याच दिवशी अटक करण्यात आली आहे. उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हनीफ मुलानी यांनी पीटीआयला सांगितले की, आरोपी राजकुमार रामशिरोमणी साहू याला त्याची पत्नी जगराणी राजकुमार साहू यांचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय होता. त्याने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, त्याने पीडितेचे हातपाय बांधले, तिच्यावर रॉकेल ओतले आणि लाईटरने तिला जाळून टाकले. महिलेला जखमी अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. आरोपीने दावा केला होता की त्याच्या पत्नीने स्वतःला घराच्या एका खोलीत कोंडून घेतले आणि आपल्या आयुष्याची अखेर केली, त्यानंतर सुरुवातीला अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला. पण तपासात त्याच्या जबाबात तफावत आढळून आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

पोस्टमार्टम रिपोर्ट आणि जोडप्याच्या सात वर्षांच्या मुलीच्या महत्त्वपूर्ण जबाबानंतर या प्रकरणाचं संपूर्ण सत्य समोर आलं. आरोपीने दावा केला होता की त्याच्या पत्नीने स्वतःला खोलीत कोंडून घेतले आणि जीव दिला. परंतु मुलाचे जबाब पतीच्या जबाबाशी जुळत नव्हते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज देखील तपासले आणि त्यात घटनेनंतर काही तासांत आरोपी घराबाहेर पडताना दिसून आला. हा एक महत्त्वाचा पुरावा होता जो घटनेवेळी घरी उपस्थित नव्हता या पुरूषाच्या दाव्याच्या विरोधात जात होता, असंही अधिकाऱ्यांनी सांगितले. पतीला अटक करण्यात आली असून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुलेट दुचाकींचा आवाज अन् DJ मुक्तीसाठी आयुष्यभर काम, सामाजिक कार्यकर्ता महिलेनं संपवलं जीवन



ठाणे। जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच विविध सामाजिक समस्याविरोधात प्रखर लढा देणाऱ्या हिराली फाउंडेशनच्या प्रमुख सरिता खानचंदानी यांनी आज गुरुवारी दुपारी एका सात मजली इमारतीवरून उडी मारत आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. जखमी सरिता यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेने उल्हासनगर शहरात एकच खळबळ उडाली आहे. उल्हासनगर शहरात एकीकडे धुमधडाक्यात गणेशोत्सव साजरा केला जात असतांना शहरात बुधवारी रात्री गोळीबाराच्या घटनेत दोघे जखमी झाले. तोच गुरुवारी दुपारी कॅम्प 4 परिसरातील विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनसमोर असलेल्या रोमा अपार्टमेंट परिसरात खळबळ उडाली. सरिता या काल गुरुवारी दुपारी आपल्या कार्यालयातून निघून थेट कार्यालयासमोरील रोमा अपार्टमेंट या सात मजल्याच्या इमारतीच्या सातव्या मजल्यावर चढल्या, त्यानंतर इमारतीच्या टेरिसवर बसून दोन्ही हात झोडून प्रार्थना करत सरिता यांनी थेट खाली उडी मारली. या थरारक घटनेचा व्हिडीओ दुसऱ्या इमारतील काही नागरिकांनी काढला. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या सरिता यांना तात्काळ जवळच्या बालाजी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना कॅम्प 3 येथील मॅक्सिलाइफ रुग्णालयात हलविण्यात आलं. मात्र प्रकृती चिंताजनक असल्यामुळे पुढील उपचारासाठी त्यांना डोंबिवली येथील एम्स रुग्णालयात हलवण्यात आलं होतं.

संध्याकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. गेली अनेक वर्षे वालधुनी नदीतील प्रदूषण, अंबरनाथ, उल्हासनगर शहरातील विविध धार्मिक उत्सवांच्या नावाखाली होणारे ध्वनी प्रदूषण, कर्कश आवाज करत शांतता भंग करणाऱ्या बुलेट दुचाकी तसेच बेकायदेशीर होर्डिंग अशा अनेक सामाजिक प्रश्नांविरोधात सरिता खानचंदानी हिंमतीने लढत होत्या. पेशाने वकील असलेल्या सरिता यांनी अनेक सामाजिक प्रश्नांविरोधात आपला न्यायालयीन लढा सुरू ठेवत प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली होती. मात्र, लढवय्या सरिता यांनी आत्महत्येचं पाऊल का उचललं, गुरुवारी त्यांचा कुणासोबत वाद झाला होता का? तसेच याबाबत नेमकी माहिती समोर आली नसून या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद दाखल करण्यात आली असून अधिक तपास पोलिस करत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली आहे.

बसमध्ये बसलेली बायको ढसाढसा रडली, एक उचकी आणि संपलं आयुष्य



अमरावती : बाकोला एक उचकी आणि बसमध्येच तिचं आयुष्य संपलं... अशात त्या महिलेसोबत काय झालं असेल असा प्रश्न तुम्हाला देखील पडला असेल. महिलेला एक फोन आला आणि महिलेच्या कानावर पडलेल्या त्या तीन शब्दांमुळे महिलंचं निधन झालं... संबंधित घटना दिल्ली येथील हरदोई येथे घडली आहे. एका महिलेचं चालत्या बसमध्ये निधन झालं. महिलेला एक फोन आला आणि फोनवर जे काही संभाषण झालं ते ऐकल्यानंतर तिचं निधन झालं. फोनवर बोलणं झाल्यानंतर महिला ढसाढसा रडु लागली. अशात तिच्या आईने काय झालं विचारलं. तेव्हा महिला म्हणाली, नवऱ्याच्या फोनवरून एक महिलेने फोन केला आणि मला म्हणाली तुझी सवत बोलतेय... हे तीन शब्द ऐकताच महिलेला उचकी आणि तिचा मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या मुलीचं नाव रिता असं होतं. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी महिलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

महिलेची आई गुड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, दीड वर्षांपूर्वी आम्ही आमच्या मुलीचं लग्न सीतापूर येथील मछरेहटा येथे केलं. लग्नाच्या 1 वर्षानंतर तिली टीबीचा आजार असल्याचं निदान झालं. त्यामुळे नवऱ्यानं तिला माहेरी सोडलं, पण उपचारानंतर पुन्हा समज घालून मुलीच्या संसाराची घडी बसवून दिली. 2024 मध्येच रिता हिच्या वडिलांचे देखील निधन झालं आहे. तेव्हा देखील रिता माहेरी आली होती. तेव्हा देखील रिता आणि तिच्या पतीमध्ये वाद झाले होते. तेव्हा सुद्धा रिता हिला माहेरी सोडून तिचा नवरा निघून गेला होता. अशात रिता देखील आई आणि भावासोबत दिल्लीत आली.

आई गुड्डी यांनी घडलेली सर्व घटना पोलिसांना सांगितली आहे. रिता हिच्या नवऱ्याच्या फोनवरून एका महिलेने तिला फोन केला. तेव्हा रिता आणि आई बसमध्ये होते. पतीचा फोन म्हणून रिता हिने फोन रिसीव्ह केला. तेव्हा तिच्या कावावर असं काही आली, ज्यामुळे ती ढसाढसा रडू लागलीङ्घ

पुढे आईने लेकीला विचारलं काय झालं. तेव्हा रिता रडत म्हणाली, एका महिलेचा फोन होता, म्हणाली, ह्यतुझी सवत बोलतेयङ्घ आता सासरी कधीच येऊ नकोसङ्घङ्घ हे सांगताना रिता हिला एक उचकी आली आणि तिचं निधन झालंङ्घ आता रिता हिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. महिलेच्या मृत्यूनंतर आईवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तर याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. ववि‌शम /कर/९२८/२०२५-२६

दिनांक - २८/०८/२०२५

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	NL03/588/2	ASS/10097	शैलेन्द्र जयगोविंद यादव	संजय यादव
2	NL03/968/24	ASS/10098	कमरजहां जावेद अली	दानिश जावेद अली सिद्धिकी
3	NL03/901/14	ASS/10099	विरेंद्र रामशरन शर्मा	विभादेवी अभयशंकर चौधरी
4	NL03/801/71	ASS/10100	शैलेन्द्र जे. यादव	प्रदिप सिंह यादव
5	NL03/744/34	ASS/10101	सत्यनारायण विरेंद्र माली	हस्तीमल केसाराम माली
6	NL02/310/4	ASS/10110	योगेश सिताराम डांगरे	कण्हेया रामजनम प्रजापती
7	NL04/442/161	ASS/10116	चंपालाल महावीरप्रसाद लाटा / विमलादेवी चंपालाल लाटा	रंजीत कुमार सोनी / खुशबू कुमारी
8	NL03/989/36	ASS/9952	प्रेम शर्मा	विजया विजय ढवळे
9	NL02/940/67	ASS/9950	पल्लवी महेश कदम	दिनेश लक्ष्मण मुकणाक
10	NL02/898/2	ASS/9951	मो. जावेद जमील अहमद शेख	राम बाबू पासवान
11	NL01/130/19	ASS/9960	विन्दयादीन रामकृपाल शुक्ला	श्रीकांत विंध्यादिन शुक्ला / चंद्रकांत विंध्यादिन शुक्ला
12	NL05/368/6	ASS/9961	नंदलाल यादव	जायत्रीदेवी नंदलाल यादव
13	NL04/390/29	ASS/9953	दिलीप मुरलीधर दास	बन्दना उदितनारायण सिंह
14	NL02/843/48	ASS/10117	दया जिवतारा जाबले	रुबिना मो. रईस शेख
15	NL02/704/37	ASS/10126	द्रौपदी सोमा भाताडे	लक्ष्मीकांत शर्मा
16	NL02/208/12	ASS/9869	सिद्धिविनायक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स	उमादेवी राजेंद्रप्रसाद मौर्या / राजेन्द्रप्रसाद मौर्या
17	NL02/530/53	ASS/10124	प्रमोद जठार	रमेश गंगाराम पाटील
18	NL02/530/10	ASS/10093	दिलीप फौजमाला सोनी	वर्षा रमेश पाटील
19	NL02/601/12	ASS/10125	मंजुळा दिनेश जाधव	सुनिता राजकुमार मंडळ
20	NL02/553/20	ASS/8447	मुमताज अब्दुल्लाह शेख	मजहर हुसेन मोहम्मद गौरे राईन

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com